लतादीदींच्या अजरामर गीतांवर रसिक मंत्रमुग्ध

नाशिक : के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित बाळासाहेब वाघ स्मृती व्याख्यानमालेचे २२ वे पुष्प महाकवी कालिदास कलामंदिर येथे संपन्न झाले. गायिका रागिणी कामतीकर यांनी मेरी आवाज ही पहचान है या सांगीतिक मैफलीतून भारतरत्न लता मंगेशकर यांच्या सुरेल आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जयप्रकाश जातेगावकर यांनी भूषविले.

दिनांक आणि वेळ : शुक्रवार
प्रा. के. एस. बंदी
सचिव

रागिणी कामतीकर यांनी लतादीदींच्या कारकिर्दीतील विविध पैलू उलगडत हिंदी व मराठीतील गीते सादर केली. गाण्यांच्या सादरीकरणासोबत गीतांमागचे भावविश्व आणि दीदींची संगीत क्षेत्रातील तपस्या यावर केलेले भाष्य रसिकांच्या मनाला भिडले. या व्याख्यानमालेचे हे २२ वे पुष्प असून, दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम देण्याची संस्थेची परंपरा याही वर्षी नाशिककरांनी अनुभवली. नाशिकच्या रसिकांनी या सुरांच्या मैफलीला गर्दी करत भरभरून दाद दिली.

बाळासाहेब वाघ यांचे शैक्षणिक आणि सामाजिक योगदान मोठे आहे. त्यांना संगीतातही विशेष गोडी होती. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित ही सांगीतिक श्रद्धांजली रसिकांच्या मनाचा ठाव घेणारी ठरली, असे मत अध्यक्षीय भाषणात जयप्रकाश जातेगावकर यांनी व्यक्त केले. [illegible] विद्यापीठात सुवर्णपदक पटकावल्याबद्दल अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थिनी संस्कृती अटल हिचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, शकुंतला वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर व सचिव प्रा. के. एस. बंदी उपस्थित होते. डॉ. सुनील कुटे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले होते.